पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. २५
वर्ष ८ वे, अंक १३ वा
किंमत १ रुपया
२१ ऑक्टोबर १९९१

# शेतकरी संघटक

## बळीराज्याची दिशा

**— शरद जोशी**

**आर्थिक आजार किती लपविणार?**

कोणाही सुबुद्ध माणसास गोंधळात टाकील असे दोन परस्परविरोधी विचार वर्तमानपत्रांत वाचायला मिळतात. पहिला, म्हटले तर विचार आहे, म्हटले तर वस्तुस्थिती आहे. नवीन औद्योगिक धोरण, रुपयाचे अवमूल्यन आणि शासनाने उचललेली अंदाजपत्रकीय आणि व्यापारी धोरणाची पाऊले यांचा अर्थव्यवस्थेवर काहीही परिणाम झालेला दिसत नाही. परदेशातील कोणी, भांडवल किंवा तंत्रज्ञान घेऊन हिंदुस्थानात धावत धावत आलेले नाही. परदेशी व्यापाराच्या परिस्थितीतही काही फरक पडलेला नाही. महागाईच्या भडकत्या ज्वाळा काही शमतांना दिसत नाहीत. ही वस्तुस्थिती आहे आणि जवळपास, डॉ. मनमोहन सिंग सोडता, सगळे अर्थशास्त्रज्ञ यापेक्षा काही वेगळे घडू शकले असते असे मानत नाहीत.

डॉ. मनमोहन सिंग मात्र देशावरचे संकट आता टळले आहे, नवीन शासनाने काही मोठा चमत्कार घडवून आणून देश संकटाच्या खाईत पडण्यापासून वाचवला आहे असे दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

दोनचार हजार कोटी रुपयांचे सोने बाहेर विकले गेले आणि पाचसहा हजार कोटी रुपयाचे नाणेनिधीचे कर्ज मिळाले यामुळे परकीय चलनाची तंगीची परिस्थिती थोडी सुधारून काहीशी सुसह्य झाली हे खरे, पण सलाईन लावल्याने तरतरी आली म्हणजे काही रोग बरा झाला असे नाही. नाणेनिधीचे हे कर्ज संपल्यानंतर कदाचित् आणखी एक दोन नवीन कर्जेसुद्धा मिळतील. पण कधीतरी अतिदक्षता- विभागातून हिंदुस्थानची अर्थव्यवस्था बाहेर काढावीच लागेल. आजाऱ्याची आज तरी अशी काही आशादायक लक्षणे दिसत नाहीत.

कितीही सोयीसवलती दिल्या तरी हिंदुस्थानातील कारखानदारी तिचा माल पदेशात काही मोठ्या प्रमाणावर निर्यात करू लागेल अशी शक्यता नाही. अत्यंत पुढारलेल्या देशांपैकी कोणता देश उत्साहाने भारताकडून माल आयात करू पाहील? अगदी उत्तम बनावटीचा माल कोणा प्रामाणिक कारखानदाराने सचोटीने तयार केला तरी त्याला परदेशी गिऱ्हाईक मिळण्याची शक्यता कमीच. प्रगत देशातील तंत्रज्ञान, त्यांचीच यंत्रसामुग्री आणि तीदेखील बहुतांशी कालबाह्य झालेली आम्ही वापरणार. भारतीय कामगारही काही कौशल्याकरता किंवा कष्टाळूपणाकरिता प्रसिद्ध नाहीत. भरीत भर म्हणून शासकीय लायसन्स-परमिट राज्याचा जाच. अशा परिस्थितीत कारखानदारीतून निर्यात ती किती होणार?

आणि, सचोटीने आपल्या मालाची गुणवत्ता सातत्याने राखणारे कारखानदारही दुर्मिळच. अगदी तिसऱ्या जगातल्या देशांमधूनही कोणा एकाच्या मालाची खरेदी करायची असे म्हटले तरी हिंदुस्थानला प्राधान्य

**बळिराज्य ही कल्पना दिशेच्या संकल्पनेसारखी आहे. आपण 'पूर्वेकडे' असे म्हणतो. पण पूर्व म्हणजे काही एका कोणा विवक्षित ठिकाणी ठेवलेली नाही. ती दिशा आहे. तसेच 'बळिराज्य' ही दिशा आहे; व्यवस्था नाही.**

मिळण्याची शक्यता कमी.

प्रगत देश सोडले तर निर्यात करण्याची शक्यता एकतर जुन्या समाजवादी देशांत किंवा आशिया, आफ्रिका या खंडांतील मागासलेल्या देशात. समाजवादी देशांशी आपला व्यापार मोठा आहे, पण तो सारा आतबट्ट्याचा व्यवहार आहे. आपण कारखानदारी माल आणि सुटे भाग प्रगत देशांकडून दुर्मिळ परकीय चलन खर्च करून आयात करायचे, त्यांची जोडाजोड करून माल बनवायचा आणि तो समाजवादी देशांकडून थातूरमातूर चलने घेऊन त्यांना विकायचा, तेदेखील त्यांनी आपल्या मर्जीने ठरविलेल्या अफलातून चलनाच्या दराने. समाजवादी देशांबरोबरचा व्यापार म्हणजे अक्षरशः 'अव्यापारेषु व्यापार' आहे. आशिया-आफ्रिकेतील काही मागासलेले देश हिन्दुस्थानचा कारखानदारी माल घ्यायला तयार असतात एवढेच नव्हे तर आपल्या मदतीने त्यांच्या देशात कारखानेसुद्धा उभारू पाहतात. पण हे देश म्हणजे बहुतांशी मागासलेल्यातील विपन्न देश. ज्यांना प्रगत देशातील आडगिऱ्हाईकी तंत्रज्ञान, यंत्रसामुग्री किंवा माल घेणे परवडत नाही अशी मंडळी भंगारबाजारात आल्याप्रमाणे हिंदुस्थानकडे येतात. त्यांच्याकडून लभ्यांश तो कितीसा असायचा?

दुष्काळात तेरावा महिना म्हणून आणखी तीन संकटे निर्यात व्यापारावर येऊन कोसळली आहेत. समाजवादी देशातील अर्थव्यवस्था कोसळल्यामुळे त्यांच्याशी होणारा 'अव्यापारेषु व्यापार'सुद्धा थिजू लागला आहे. समाजवादी साम्राज्य कोसळल्यामुळे आणखी एक आफत ओढवली आहे. हिन्दुस्थानसारख्या तिसऱ्या जगातील देशांना आता दोन महासत्तांच्या झुंजीचा लाभ करून घेणे दिवसेंदिवस कठीण होत जाणार आहे. हिंदुस्थानातील व्यापारावरील नियंत्रणाबाबत अमेरिकेने घेतलेली कडक भूमिका, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने हिंदुस्थानच्या लष्करी खर्चावरील घेतलेले आक्षेप आणि बौद्धिक मालमत्तेच्या हक्कांसंबंधी (Intellectual Patent Rights) अमेरिकेने घेतलेली ताठर भूमिका यावरून एवढे तर स्पष्ट होते की येणाऱ्या एककेंद्री जगात हिंदुस्थानची स्थिती मोठी केविलवाणी होणार आहे. तिसरे संकट म्हणजे, भारतातील धावत्या भेटीसाठी येणेसुद्धा परदेशातील, विशेषतः उच्चपदस्थांना धोक्याचे वाटते. काश्मिरमध्ये इस्रायली प्रवाशांवरील हल्ला आणि त्यांचे अपहरण, आसामामधील रशियन तंत्रज्ञाची हत्या आणि आता रूमानियाच्या राजदूताचे अपहरण यांचा हिंदुस्थानच्या परदेशी व्यापारावर गंभीर परिणाम होणार आहे.

थोडक्यात, आर्थिक आजार आता बळावला आहे, उपाययोजना काही केवळ आर्थिक राहिलेली नाही. आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा एक भाग म्हणून राहायचे असेल तर अंतर्गत अर्थव्यवस्था मजबूत केली पाहिजे, एवढेच नव्हे तर राजकीय व्यवस्था सुदृढ, कायद्याच्या आणि शांततेच्या राज्याची शाश्वती देणारी हवी.

असे होत नाही तोपर्यंत वाढवून वाढवून निर्यात किती वाढणार? परवा श्री. चिदंबरम् यांनी पुण्यातील एका कंपनीला त्यांच्या निर्यातीसंबंधी कामगिरीबद्दल मोठे प्रशस्तीपत्रक दिले. काय कामगिरी बजावतात असले कारखानदार? ही मुळातली कारखानदारीच परदेशी सहाय्याने उभी झालेली आहे. मूळ पाश्चिमात्य कंपनीला जो माल तयार करणे परवडत नाही त्या मालाचे उत्पादन हिंदुस्थानसारख्या देशातून ते करून घेतात. पुष्कळ वेळा त्यासाठी लागणारे सर्व सुटे भाग तेथूनच पाठविले जातात आणि इथे फक्त जोडले जातात. मूळ आराखड्यानुसार जोडणी झाली की तयार मालाची निर्यात झाली असे कागदोपत्री दाखविण्यात येते आणि अशी निर्यात करण्यासाठी सुट्या भागांची आयात करण्याची अनुमतीही त्यांना मिळते. असला हा अद्भूत खेळ आहे.

निर्यात वाढविणे तर जरूर आहे. त्याशिवाय परकीय चलन मिळत नाही. कारखानदारी मालाची निर्यात करणे तर शक्य नाही. तेव्हा हिंदुस्थानातील मोठे मोठे नामवंत कारखानदार आता निर्यातसंस्था काढत आहेत. निर्यात कशाची करतात? तर, प्रामुख्याने कच्च्या मालाची. किर्लोस्कर चामड्याच्या वस्तू निर्यात करू पाहातात. टाटा हळदीच्या आणि मसाल्याच्या भुकटी आणि गुलाबाची फुले परदेशात पाठवू पाहातात. कल्याणींसारखे उद्योजक ग्रामीण उद्धाराचा उद्घोष करीत आंबे आणि फळांच्या कापा निर्यात करण्याचा घाट घालतात.

या प्रयत्नांत काही चुकीचे आहे असे नाही. दुसरा काही मार्गही त्यांच्यासमोर नाही. अशांच्या प्रयत्नाने

शेतीमालाच्या निर्यातीस थोडा वाव मिळाला तर ते चांगलेच कलम म्हणावे लागेल. पण, जून महिन्यापासून ते सप्टेंबर महिन्यापर्यंत आर्थिक संकट टळण्यासारखे काही घडले असे कोणी म्हणू लागले तर ते राज्यकारण होईल, राजकारण नाही आणि अर्थकारणही नाही. शेतकऱ्याचा मुलगा मंत्री झाला म्हणजे तो नुसता मंत्रीच राहतो, त्याची शेतीशी नाळ तुटते हे जितके खरे तितकेच हेही खरे की डॉ. मनमोहन सिंग यांच्यासारखा अर्थशास्त्री मंत्री झाला म्हणजे तो मंत्रीच उरतो, अर्थशास्त्री रहात नाही.

संकट टळलेले नाही, संकट टळण्याची काही शक्यताही दिसत नाही. दरीत पाय घसरून पडायचे आतापुरते टळले आहे. पण यापुढेची वाट आणखीच कठीण, निसरडी होत चालली आहे.

**'चैत्रगौरी' कारखाने वर देऊ शकत नाहीत**

देशावरील संकट टळण्याची लक्षणे दिसत नाहीत हा मुद्दा मुद्दाम आग्रहाने अशाकरिता मांडला की या बाबतीत कोणताही भ्रम राहू नये. संकटाच्या कराल स्वरूपाची पूर्ण जाणीव असणे संकटास सामोरे जाण्याकरिता जास्त उपयोगी आहे. भाबडी आशा, या उलट, अगदी घातक ठरू शकते. नेहरू-प्रणीत अर्थव्यवस्थेचा अंतःकाल झाला आहे, शेतीच्या शोषणाच्या आणि परकीय तंत्रज्ञानाच्या आधाराने नोकरशाहीच्या अधिपत्याखाली 'चैत्रगौरी'प्रमाणे कारखाने सजविण्याची नेहरूपद्धती आता पुन्हा वर येऊ शकत नाही. यापुढे नोकरशाहीचे आधिपत्य मान्य होण्यासारखे नाही. 'चैत्रगौरी'सारखे सजविले तरी कारखाने काही प्रसन्न होऊन वर देऊ शकत नाहीत. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आयातनिर्यातीची ढवळाढवळ करून शेतीमालाचे भाव पाडण्याचा उद्योग करण्याची ताकद शासनात राहिलेली नाही आणि तशी ताकद परत येण्याची फारशी शक्यताही दिसत नाही. ओंगळ नेहरू-व्यवस्था संपलीच पण त्याबरोबर शासनाची काही मंगल भूमिकाही संपुष्टात आली. कल्याणकारी राज्याची संकल्पनाही झपाट्याने पुसट होत जाणार आहे. शोषून चिपाड झालेल्या शेतकऱ्याच्या मदतीच्या देखाव्यासाठीसुद्धा आधारभूत किंमतीची अंमलबजावणी करणे कठीण होणार आहे. थोडक्यात, आर्थिक शासनसंस्थेचा अंत होत आहे. गेल्या दोन तीन शतकांत शासन अधिकाधिक व्यापक बनत चालले होते. संरक्षण, कायदा आणि सुव्यवस्था ही शासनाची मूळची कामे. त्याबरोबर, कल्याणकारी शासन, अर्थव्यवस्थेवर देखरेख ठेवणारे शासन आणि शेवटी प्रत्यक्ष अर्थव्यवस्था चालविणारे शासन असा हा फुगा फुगत चालला होता त्याला टाचणी लागली आहे. कायदा आणि सुव्यवस्था टिकवण्याचा आणि देश अभंग ठेवण्याचा प्रयत्न करणारे एवढ्यापुरतीच शासनाची भूमिका मर्यादित राहाणार आहे. ही काही केवळ हिंदुस्थानात घडणारी गोष्ट आहे असे नव्हे. हा नव्या कुंपणविरहित क्रांतीचा भाग आहे.

**बुडाला 'इंडिया' पापी**

शेतकऱ्याचे मरण असे धोरण असणारे शासन बदलून शेतकऱ्यांच्या हिताचा यथायोग्य मुलाहिजा ठेवणारे सरकार येईल हे काही आता शक्य नाही. शेतकऱ्याला गुलामीत ठेवणाऱ्या जुलमी सत्ताधाऱ्यांचा पराभव करण्याचा आनंद कष्टकरी शेतकरी समाजाला मिळणार नाही. दुर्योधनाचे रक्त पिण्याचा आणि त्याच्या रक्ताने माखलेल्या हाताने द्रौपदीची वेणी बांधण्याचे समाधान एखाद्या बलभीमालाच मिळते. तेवढे अपले सामर्थ्यही नव्हते आणि पुण्याईही नव्हती. शेतकरी आंदोलनाची स्थिती हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यलढ्यासारखीच झाली आहे. इंग्रज हटले पण त्यांचा पराभव काही आमच्या या हातांनी केला नाही; कोणा हुकुमशहाशी लढता लढता साम्राज्यशहा इंग्रज इतका कमजोर झाला की तो हिंदुस्थान सोडून निघून गेला. 'भारता'वर सत्ता गाजवणाऱ्या जुलुमशहांचा पराभव आमच्या हाताने झाला म्हणणे कठीण आहे. स्वतःच्या सामर्थ्याच्या मस्तीत आपल्याच शिरावर आपलाच हात ठेवून राख झालेल्या भस्मासुराप्रमाणे त्यांचा अंत होतो आहे. आमच्या तुरुंगांच्या दारांवरील कुलुपे गळून पडली आहेत, कड्या निखळल्या आहेत, कोणी पहारेकरीही राहिलेला नाही. अगदी कैदेतून बाहेर काढण्याकरीतासुद्धा कुणी नाही. आपल्याच हातांनी दरवाजा ढकलून, आवश्यक तर निखळवून बाहेर पडायचे काम करायचे आहे.

छत्रपतींच्या स्वराज्यस्थापने-नंतरच्या रामदासांच्या वचनांत सांगायचे तर

***बुडाला 'इंडिया' पापी***

*दुष्ट-संहार होतसे*
*बळिराज्य येतसे आता*
*आनंदवनभुवनी*

बळिराज्य म्हणजे काही शेतकऱ्यांचे स्वर्गराज्य नाही. जेथे कोणताच अन्याय नाही, शोषण नाही अशी आदर्श समाजव्यवस्था, चिरंतन टिकणारी, कधी पृथ्वीवर अवतरेल हे असंभवच नव्हे तर अशक्य आहे. बळिराज्य ही कल्पना दिशेच्या संकल्पनेसारखी आहे. आपण 'पूर्वेकडे' असे म्हणतो. पण पूर्व म्हणजे काही एका कोणा विवक्षित ठिकाणी ठेवलेली नाही. ती दिशा आहे. तसेच 'बळिराज्य' ही दिशा आहे; व्यवस्था नाही. बळिराज्याची दिशा कोणती? निसर्ग आणि त्यातील ऊर्जास्रोत यांतून मनुष्यप्राण्याच्या श्रमाने जगण्याकरिता आवश्यक ती साधनसामुग्री तयार करावी. उत्पादन असे करावे की कालच्यापेक्षा आज जास्त पिकावे पण त्यासाठी उद्याच्या सृष्टीवर विपरीत परिणाम घडू नये. वाढत्या उत्पादनातून माणसास वेगवेगळी साधनसामुग्री आणि समाजव्यवस्था अशी जोडता यावी की त्याच्या स्वातंत्र्याच्या कक्षा सतत चढत्या राहतील. ही बळीराज्याची दिशा आहे. आजपर्यंत उत्पादन वाढविण्याचे भरकस प्रयत्न झाले, उत्पादन वाढलेही. अगदी निसर्गाशी शत्रुत्व साधूनसुद्धा उत्पादन वाढवले गेले. पण वाढत्या उत्पादनाचा लाभ काही थोड्या देशांच्या आणि प्रत्येक देशातील मूठभर लोकांना झाला. आता हे लोभी दूर झाले असे धरले तर आपण ज्या दिशेने फरफटत चाललो होतो ती दिशा सोडून बळीराज्याची दिशा नेमकी पकडायची कशी?

शेती पराकोटीच्या कार्यक्षमतेने करणे म्हणजे काटकसरीने करून अधिकाधिक उत्पादन घेणे. असे करतांना निसर्ग हा आपण आपल्या मुलांनातवांकडून उसना घेतला आहे याची पूर्ण जाणीव ठेवून त्याचा विनाश होऊ न देणे हा एक भाग.

तयार झालेल्या मालाच्या साठवणुकीची, प्रक्रियेची आणि विक्रीची अशी व्यवस्था करणे की ज्यामुळे शेतीत अधिकाधिक भांडवल निर्मिती होऊ शकेल हा दुसरा भाग.

या दोनही भागांपेक्षा एक तिसरा भाग फार महत्त्वाचा आहे. उत्पादन तर नेहरू-राज्यातही वाढले. भले, निसर्गाचा विनाश करून का होईना, देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. नेहरूकाळात साखरेचे कारखाने निघाले, सूतगिरण्या निघाल्या, इतर प्रक्रियेचे कारखानेही निघाले. पतपुरवठ्याची व्यवस्थाही झाली. पण, या सर्वांचा परिणाम समग्र शेतीसमाजाची उन्नती होण्यात झाला नाही, तर शेतीसमाजातला एक वरचा थर यामुळे संपन्न बनला, सामर्थ्यशाली बनला आणि सत्तेमध्ये सहभागीही झाली. बळिराज्याच्या दिशेची वाटचाल ही उत्पादन, साठवणूक, वाहतूक, प्रक्रिया आणि विक्री अशा तऱ्हेने करेल की त्याच्या लाभातून कोणताही समाज वगळला जाणार नाही.

सर्वांनाच हा लाभ मिळेल अशी अपेक्षा ठेवणे चुकीचे आहे. किंबहुना, सर्वांपर्यंत लाभ पोहोचविण्याची कल्याणकारी कल्पना मूलभूत कार्यक्षमतेला हानीकारक ठरण्याचा धोका आहे. कोणी आळशी, अजागळ स्वतःलाही लाभ झाला पाहिजे म्हणू लागला तर कार्यक्षम अर्थव्यवस्थेत अशा मागणीला थारा देता येणार नाही. करूणेपोटी, दयेपोटी, दानधर्म म्हणून त्याच्या उदरनिर्वाहाची सोय समाज करेल पण तो व्यवहार धर्मव्यवस्थेचा, अर्थव्यवस्थेचा नाही.

पण कोणीएक माणूस केवळ अमक्या जातीचा आहे, अमूक एका वर्गाचा आहे, स्त्री आहे, पुरुष आहे, शेतकरी आहे, मजूर आहे म्हणून आर्थिक विकासाच्या लाभापासून वंचित राहाता कामा नये.

**प्रक्रियाउद्योगही लोकोपयोगी झाले नाहीत**

साखर कारखान्यांच्या परिसरात काय दिसते? उसाचे उत्पादन वाढावे म्हणून कारखाने पाणीयोजना राबवतात आणि उत्पादनासाठी सुधारित जाती इत्यादींना उत्तेजन देतात. उसाच्या पिकासाठी पीककर्ज सुलभतेने मिळते. या एवढ्या गोष्टींचाच फायदा काय तो सर्वसामान्य ऊसशेतकऱ्यांपर्यंत पोहोचतो. बाकी कारखानदारीचा फायदा यंत्रसामुग्री तयार करणारे कारखानदार, तंत्रज्ञ, कारखान्यातील अधिकारीवर्ग, कारखान्यातील कामगार, वाहतुकीची कामे मिळविणारे आणि सर्वात अधिक म्हणजे संचालक मंडळ यांनाच काय तो मिळतो. एका काळी ऊसतोडणी कामगारांची मोठी हालाखी होती. आज त्यांची स्थितीसुद्धा ऊसशेतकऱ्यापेक्षा जास्त चांगली झाली आहे. कारखानदारीचा लाभ ज्यांना मिळाला त्या समाजांचा थर शेतकरी समाजापासून अलग पडला. शेतकऱ्याच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाविषयी त्यांना तळमळ नाही एवढेच नव्हे तर बहुधा ही मंडळी

शेतकऱ्याच्या विरोधात उभी ठाकतात. थोडक्यात, साखर कारखानदारीने 'भारता'तील एक भाग 'इंडिया'त सामावून घेतला. 'भारत' जसाच्या तसाच राहिला.

दुसरे एक मोठे चमत्कारिक उदाहरण दूधप्रक्रियेच्या उद्योगधंद्यांसंबंधी आहे. डॉ. कूरियन यांनी परदेशातून दुधाची भुकटी आणि चरबी वर्षानुवर्षे फुकट मिळवून ती हिंदुस्थानातल्या बाजारात ओतली आणि दुधाचे भाव पाडले. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांवर विपरीत परिणाम झाला. पण दुधाची साठवणूक, वाहतूक, प्रक्रिया यांकरिता लागणारी संचरचना त्यांनी मिळालेल्या भांडवलातून उभी केली. काही परदेशी कंपन्या दुधापासून लहान बालकांचे अन्न, चीज, लोणी इत्यादी पदार्थ भारतात बनवू इच्छितात, पण अशा योजनांना डॉ. कूरियन यांचा विरोध आहे. त्यांचे म्हणणे असे की दुग्धजन्य पदार्थांचा व्यवहार फायद्याचा आहे आणि शहरांना पेय दूध पुरविणे हा धंदा तोट्याचा आहे. त्यामुळे परदेशी कंपन्या फक्त फायद्याचे लोणी लाटू इच्छितात आणि दूधपुरवठ्याचा तोट्याचा धंदा मात्र सहकारी आणि सरकारी व्यवस्थांच्या डोक्यावर पडतो.

युक्तिवाद दिसायला रास्त वाटतो, पण गंमत अशी की हिंदुस्थानात शेतकऱ्यांच्या दुधाला सर्वात जास्त भाव कोणी देत असेल तर सूरत येथील 'सुमूल' ही सहकारी संस्था. आज ती ६ टक्के स्निग्धांशाच्या दुधास शेतकऱ्यांना ७ रु. प्रतीलिटर किंमत देते. अगदी गुजरातमधीलसुद्धा कोणतीही संस्था शेतकऱ्यांना एवढी किंमत देऊ शकत नाही. सुमूल डेअरीला हे कसे काय जमते? सुमूलच्या अध्यक्षांचे म्हणणे आहे की ते फक्त पेय दुधांचाच व्यवहार करतात, दुग्धजन्य पदार्थ तयार करण्याच्या भानगडीतच पडत नाहीत त्यामुळे त्यांना जास्त किंमत देता येते. दुग्धजन्य पदार्थ बाजारात खूप चांगली किंमत मिळवितात हे खरे पण ते पदार्थ तयार करण्याचा खर्च त्याहीपेक्षा जास्त येतो आणि त्यामुळे शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था तोट्यात जातात.

हे असे आहे तर मग परदेशी कंपन्यांना हा धंदा करणे फायद्याचे कसे काय वाटते? चीज तयार केल्याने सुमूलचा तोटा होतो पण नेस्लेला अफाट फायदा होतो हे कसे काय? या रहस्यातच एक मोठी मख्खी आहे. कोणताही प्रक्रियेचा कारखाना, मग तो साखरेचा असो, का चीजचा असो का अगदी शॅम्पेनसुद्धा तयार करण्याचा असो तो, हिंदुस्थानात काढणे यात कठीण काहीच नाही. खिशात पैसा असला तर पोटातले पाणीसुद्धा न हलवता कारखाना सुसज्ज तयार मिळू शकतो. असे कारखाने उभारून देण्याची कंत्राटे घेणाऱ्या अनेक कंपन्या हिंदुस्थानात आहेत. वारणेला श्रीखंड करायचे झाले किंवा आणंदला चीज तयार करायचे झाले तर या कंपन्यांशी बोलणी करून त्यांना कंत्राटे देणे यापलिकडे फारसे काही करायचे राहात नाही. पण ही भांडवली गुंतवणूक इतकी अवाढव्य होते की यंत्राच्या आयुष्यकाळात त्यावरील व्याज आणि घसारा काढणेसुद्धा अशक्य व्हावे. नेस्लेसारख्या कंपन्यांना ही अडचण नसते. आवश्यक ती यंत्रसामुग्री ते स्वतःच्या साधनांतून त्या मानाने किरकोळ खर्चात तयार करतात आणि त्यामुळेच त्यांना या धंद्यात फायदा काढता येतो.

भारतात प्रक्रियेचे कारखाने काढायचे म्हटले म्हणजे या कंत्राटदारांनाचा आश्रय घेणे अपरिहार्यच होऊन जाते, शेतीमालावरील प्रक्रिया हे तसे मोठे उंचीचे तंत्रज्ञान आहे. पदार्थांचा मूळचा स्वाद कुठेही बदलू न देता निर्जंतुक पद्धतीने त्यावर प्रक्रिया करून सोयीस्कर रीतीने त्यांना डबाबंद करून ग्राहकापर्यंत पोहाचविणे हा सगळा कार्यक्रम तसा मोठा कठीण आहे.

तरीदेखील, पैसे टाकून का होईल असा सुसज्ज कारखाना उभा राहिला म्हणजे संबंधितांना त्याचे मोठे कौतुक वाटते. फायदा होवो न होवो आपण काही कामगिरी बजावली असा एक अभिमानही त्यांना साहजिकच वाटतो. या सगळ्या कोऱ्या करकरीत यंत्रसामुग्रीची बटणे कधी आणि कशी दाबायची हे ठीकठाक कळू लागेपर्यंत आणखी सुधारित तंत्रज्ञानाची यंत्रसामुग्रही पुढे येते आणि बाजारातील स्पर्धेत टिकून राहण्याकरिता ती खरीदणे आवश्यक होऊन बसते. जुन्या तंत्रज्ञानाचा वास लागून तो आत्मसात होण्याआधीच नवीन तंत्रज्ञान पुढे येते आणि भारत व विलायतेतील तंत्रज्ञानाची दरी अधिकाधिक रुंदावत जाते. या असल्या 'चैत्रगौरी' कारखानदारीमुळेच तर हिंदुस्थानवरील आजचे आर्थिक अरिष्ट ओढवले आहे.

**स्त्रियांवर विपरीत परिणाम**

या कारखानदारीने झालेल्या

मर्यादित आर्थिक विकासाचा एक अगदी विपरीत परिणाम स्त्रियांवर होतांना दिसतो. परिसरांतील विकास जितका पुढे जावा तितके स्त्रियांच्या आयुष्याची गुणवत्ता आणि त्यांच्या स्वातंत्र्याच्या कक्षा उतरतात. उदाहरणांवरून हे समजणे जास्त सोपे जाईल.

एखादा कारखाना उभा राहिला आणि आसमंतात जरा पैसा खेळू लागला की पहिल्यांदा जागोजाग दारूची दुकाने दिसू लागतात, हातभट्टीची चलती होते. एक बकालीपणा तयार होतो. ज्या प्रदेशात स्त्रिया अगदी अंधार झाल्यावरसुद्धा बिनधास्त, मोकळेपणे फिरू शकत असत तेथे संध्याकाळ झाल्यानंतर, अंधार पडल्यावर त्यांना घराबाहेर पडणेसुद्धा मोठे दुरापास्त होऊन जाते. घर ते शेत आणि शेत ते घर असे कुंपण त्यांच्या हालचालींवर पडते. पंजाबसारख्या राज्यात तर स्त्रियांची कुचंबणा याहूनही अधिक होते. इतर राज्यांतील शेतमजूर तेथे मुबलक मिळू लागले आणि असुरक्षिततेचे वातावरण वाढले तसे स्त्रियांना शेतावर जाण्याचीसुद्धा शक्यता कमी होऊ लागली. त्या घरातच बंदिस्त झाल्या. निदान मोकळ्या हवेत काम करण्याचे स्वातंत्र्य जाऊन अंधाऱ्या घरात सर्वांकरिता रोट्या बनविण्याचे काम त्यांच्या कपाळी आले.

यंत्रांची मदत मिळू लागली म्हणजे आणखीही मोठा विचित्र प्रकार घडतो. डोक्यावर भारी पाटी घेऊन बाजारात जायचे असले की ते काम बाईचे, पण मालकाने ट्रॅक्टर घेतला की माल भरलेला ट्रॅक्टर बाजारात डौलात घेऊन जाण्याचे काम पुरुषांचे. अवजड अडकित्त्याने कडब्याची कुट्टी करायचे काम बाईचे, पण कुट्टी यंत्र आले तर त्याची बटणे दाबायचे काम पुरुषांकडे जाते.

बळिराज्याकडे वाटचाल करतांना आपण आपल्याच पावलाखाली बळिराजाला पुन्हा एकदा नव्याने तुडवत नाही ना याची दक्षता घेणे आवश्यक आहे. आधुनिकीकरण करायचे तर आहे. कारखानदारी वाढवायची आहे, औद्योगिकरण करायचे आहे, शेतीवरील माणसे बिगरशेती कामाकडे न्यायची आहेत. पण हे सगळे काम गर्भाच्या वाढीसारखे आहे. त्यात घिसाडघाईला जागा नाही. कोणी गर्भकाल आखूड करायचा प्रयत्न करू लागला तर त्यात फक्त गर्भाचा जीवच धोक्यात येतो. बळिराज्यातली सर्व व्यवस्था निसर्गनियमाने आणि सहजपणे बहरून आली पाहिजे. पहिल्या पावसानंतर सगळे आसमंत हिरवेगार दिसू लागते तसाच हा चमत्कार घडून येऊ शकतो. स्वार्थापोटी काही भानगडी मंडळींनी काही ढवळाढवळ केली नाही तर हे होणार आहे. हा चमत्कार 'याची देही, याची डोळा' पाहाण्याचे भाग्य आपल्याला लाभणार आहे – **आपण ठरवले तर.**

●●●

## नांदेड, परभणी
# लक्ष्मीमुक्ती ग्रामगौरव समारंभ

शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांनी नांदेड जिल्ह्यात २ ते ४ ऑक्टोबर व परभणी जिल्ह्यात ५ व ६ ऑक्टोबर १९९१ या दिवशी दौरा करून ज्या ज्या गावांनी शेतकरी महिला आघाडी व शेतकरी संघटनेचा लक्ष्मीमुक्त कार्यक्रम स्वीकारून गावातील मायबहिणींच्या नावे जमिनीचा हिस्सा करून त्यांना संपत्ती-अधिकाराचा सन्मान दिला त्या गावांचा सन्मानपत्र देऊन गौरव केला.

**लक्ष्मीमुक्ती झालेल्या गावांची यादी**

**नांदेड जिल्हा**

| **गाव** | **तालुका** | **सन्मानीत महिलांची संख्या** |
|---|---|---|
| शिरसी (खुर्द) | कंधार | १०२ |
| सिरसी (बु.) | कंधार | – |
| वजीरगाव | बिलोली | ११० |
| कापसी (खुर्द) | कंधार | १४२ |
| पाटोदा | बिलोली | १०५ |
| कुंदुर | बिलोली | १४ |
| सुजलेगाव | बिलोली | ५३ |
| हंगरगा | बिलोली | २६ |
| बेलकोळी | बिलोली | १६ |
| शिरूर | भोकर | – |
| भायेगाव | भोकर | ५४ |
| राहाटी | भोकर | ६२ |
| बोळसा | भोकर | १९ |
| मनुर | भोकर | ६ |
| जामगाव | भोकर | २ |
| शेलगाव | भोकर | ११ |
| सिंधी | भोकर | १०१ |
| लिंबगाव | नांदेड | १०० |
| पोखर भोसी | कंधार | ११० |
| आलेगाव | कंधार | १०३ |
| बाचोटी | कंधार | १०१ |
| काटकळंबा | कंधार | १०१ |
| परभणी जिल्हा | | |
| पेठशिवणी | गंगाखेड | १०३ |
| आरळ | वसमत | १०८ |
| उमरा | कळमनुरी | ५६ (एकूण ७० पैकी) |
| टाकळी ज्गछण | कळमनुरी | १०३ |
| सांडस | कळमनुरी | १२३ |
| कापडसिंगी | जिंतूर | १०५ |
| करंजी | जिंतूर | १०२ |
| चामणी | जिंतूर | १०८ (एकूण १२० पैकी) |
| मारवाडी | जिंतूर | १०५ |

# माझे पाय मुंबईत टेकतच नाहीत

**सौ. आशा यादव**
**(आशा श्रीरंगराव मोरे)**
**नालासोपारा**

**आदरणीय शरदभाऊ,**
**स. सा. नमस्कार.**

आळंदीची बैठक संपवून बप्पा व वहिनी मुंबईला माझे घरी आले. रात्री उशिरापर्यंत बैठकीत झालेल्या निर्णयांवर आमची चर्चा झाली. सगळे झोपले, मला मात्र झोप येत नव्हती. पूर्वी शेतकरी संघटनेत केलेल्या कामाच्या आठवणीचं मनात काहूर उठलं होतं. मनात आलं आपल्याला पत्र लिहावं. आणि लागलीच लिहिण्यास बसले.

मी पाचसहा वर्षांची असतानाच 'शेतकरी शेतमजूर संघटनेचा विजय असो' ही घोषणा माझ्या कानावर पडत होती. आम्ही लहान मुलं ही घोषणा देत गावभर फिरयचो. बप्पांनी सुरू केलेल्या संघटनेची ही घोषणा होती.

आपण शिबिराच्या निमित्ताने मोरेवाडीला आलात. मी शिबिराला दिवसभर हजर असायचे. पण भाऊ, त्यावेळी आपण मांडलेला विचार माझ्या डोक्यावरून गेला. १० नोव्हेंबर १९८१ च्या आंदोलनाच्या प्रचाराच्या निमित्ताने आपली व माधवराव खंडेराव मोरे यांची आंबाजोगाईला सभा झाली. त्या वेळेला मोरेवाडीच्या खूप महिला हजर होत्या. त्या सभेचा परिणाम महिलांच्या मनावर जबरदस्त झाला होता. अंबेजोगाईहून परतत असतानाच महिलांचा रस्ता राको करण्याचा निर्धार झाला.

बप्पांना आणि इतर कार्यकर्त्यांना आंदोलनाच्या दोन दिवस अगोदरच अटक झाली. आंदोलन होणार नाही या भ्रमात पोलिस होते. १० नोव्हेंबरला सकाळी ६ वाजता संपूर्ण मोरेवाडी गाव रस्तावर होतं; त्यात २०० महिला होत्या. सकाळी ८ च्या सुमारास बीडहून पोलिस कुमक मोठ्या प्रमाणावर आली. अटकसत्र सुरू झाले. तोपर्यंत गावचे शेतकरी जमले गर्दी कमी होत नव्हती. पोलिसांनी बेछूट लाठीमार केला. फक्त ५२ महिला मात्र पाय रोवून बसल्या. पोलिसांचा महिला पोलिसांअभावी नाइलाज झाला. दुपारी ३ वाजेपर्यंत एकही पुरूष सोबतीला नसतांना आम्ही ५२ महिलांनी बंदुकीच्या धाकाला न जुमानता रस्ता अडवला. पोलिस बप्पांना घेऊन आले. त्यांच्या आदेशावरून आम्ही अटक करून घेतली. पळून गेलेले सर्व स्त्रीपुरूष पुन्हा पोलिसस्टेशनला एकत्र झाले. रात्रभर जामीन होत राहिली.

सटाण्याच्या अधिवेशनाला आम्ही मोरेवाडीच्या १२ महिला उपस्थित होतो. मला चांगलं आठवतं, अधिवेशनाचं सत्र चालू असताना लीलाताई आमच्यात बसलेल्या असत. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ताईचं भाषण झालं, ते पहिलंच भाषण माझ्या अजूनही आठवणीत आहे. रात्री ताई आम्ही थांबलेल्या हॉलमध्ये आल्या, आमच्याशी बोलत बसल्या. त्यांच्या लक्षात आलं, आमच्याकडे पुरेशा प्रमाणात अंथरूण नव्हतं. त्यांनी लगेच मोठी सतरंजी मिळवून दिली. लीलाताईचं अधिवेशनातलं पहिलं भाषण आणि 'भूमिसेवक' मधला त्यांचा एकुलता एक लेख माझ्या अजूनही आठवणीत आहे. लीलाताईचा त्यावेळचा आमच्या सोबतचा फोटो आजदेखील माझ्याजवळ सुरक्षित आहे.

'भूमिसेवक' साप्ताहिक १९८० साली केव्हातरी प्रकाशित होऊ लागलं. माझी आई निरक्षर. त्यामुळे भूमिसेवकच्या घड्या घालण्याचं काम तिच्या एकटीकडेच असे. रात्रभर ती एकटीच घड्या घालीत बसायची. आम्ही दोघी बहिणी, माझी वहिनी, भाऊ आणि गावातील इतर विद्यार्थी पत्ते लिहिण्याचं आणि तिकीटं चिकटविण्याचं काम आठवड्यातले दोन ते तीन दिवस नित्यनेमाने करीत असू.

भूमिसेवकच्या प्रत्येक अंकाचं प्रकाशन एका नवीन गावी जाऊन रोपटं लावून केलं जात असे. एके दिवशी रात्री देविदास पवारचा फोन आला. रेणापुरचा अंकाचा प्रकाशन समारंभ आटोपून परतत असतांना दम लागतोय म्हणून बप्पांना मेडिकल कॉलेजच्या दवाखान्यात शरीक केले आहे. आईच्या रडण्याचा आवाज ऐकून आम्ही सर्व जण जागे झालो. पावसाची रिपरिप चालू होती. दवाखान्यात गेलो. मेडिकल कॉलेजचे डॉ. डावळे जातीने हजर होते. म्हणाले, "रक्तदाब खूपच वाढला आहे. काळजीचं आता कारण नाही पण विश्रांतीची गरज आहे. यापुढे शेतकरी संघटना आणि भूमिसेवकचे काम बंद करावे लागेल." डॉक्टरांनी आग्रहाने सांगितले पण बप्पांनी आजारपणात पडून असतानाच पुढच्या आठवड्याचा अंक तयार करून छापून घेतला. डॉक्टरांचा सल्ला न जुमानता अंकाच्या प्रकाशनासाठी बप्पा जवळगावला निघून गेले.

महिला आघाडीची बैठक गिरवलीला बोलावली होती. महिलांपुढे बप्पांनी प्रास्तविक केले. पण पुरूष मंडळी समोर असल्यामुळे आम्ही महिला कोणीच बोलत नव्हतो. म्हणून सर्व पुरूष मंडळी बाहेर उठून गेली. मग मात्र प्रथम मी आणि सुमनताई बोललो. भाषण करण्याचा आमचा तो पहिलाच प्रसंग होता. पण बाहेर बसून ऐकणाऱ्या पुरूष मंडळींना आमचे फार कौतुक वाटले. बप्पांच्या चेहऱ्यावर मला आनंद दिसत होता. रात्री आम्ही घरी परतलो तेव्हा त्यांनी मला एकटीला बोलावून घेतलं आणि "तू महिला आघाडीच्या बांधणीला सुरूवात कर" असा

आदेश दिला. तिसऱ्याच दिवशी दारात जीप उभी केली आणि त्यानंतर मी आणि सुमनताई महिलांच्या बैठका व मेळावे घेत गावोगावी फिरत राहिलो.

नांदेडच्या परिषदेच्या तयारीसाठीही शंकर धोंडग्यांनी जीप पाठवून दिली. आईचा विरोध असतांनाही बप्पांच्या पाठिंब्याने नांदेड जिल्ह्यात एक महिन्यापेक्षाही जास्त दिवस आम्ही प्रचार करीत फिरलो. परिषदेसाठी हजारो महिला एकत्र केल्या. महिलांची संख्या इतकी प्रचंड होती की दोन दिवसांपैकी एक दिवसाची परिषद आम्ही महिलांनीच चालविली. ही परिषद आमच्या दृष्टीने चांदवडच्या महिला अधिवेशनाची रंगीत तालीमच ठरली.

त्यानंतर, अंबाजोगाईच्या ज्वारी परिषदेसाठी, सुमनताई बप्पांबरोबर कर्नाटकात गेल्यामुळे प्रचाराची जबाबदारी माझ्या एकटीवरच पडली. या परिषदेलासुद्धा दहा हजारांवर महिला हजर होत्या.

नांदेडच्या शेतकरी परिषदेच्या वेळी मी बारावीच्या वर्गात शिकत होते. शेतकरी संघटनेच्या कामामुळे मी बारावीच्या परीक्षेलासुद्धा बसू शकले नाही. माझं शिक्षण नंतर खंडितच झालं. दोन महिन्यांपूर्वी बप्पांचे एक स्नेही प्रा. सुंदर गव्हाणे मुद्दाम मला भेटण्यासाठी नालासोपाऱ्याला आले होते. दिवसभर शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीच्या विषयांवर चर्चा झाली. अर्थशास्त्राच्या एका प्राध्यापकाने घेतलेले आक्षेप मी समर्थपणे खोडून काढू शकले. तरी शेवटी ते म्हणालेच, "तुझ्यासारख्या टॅलेन्टेड मुलीला संघटनेच्या कामामुळे शिक्षणापासून वंचित व्हावे लागले." त्यांनी गावाकडे जाऊन बप्पांनासुद्धा हेच सुनावलं. पण, बिचाऱ्या सुंदर गव्हाण्यांना काय ठाऊक की माझ्यासारखी, सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबातली मुलगी अधिकात अधिक बी.ए. पर्यंत शिकणार आणि त्यानंतर आयुष्यभर एका शेतकऱ्याचंच घर सांभाळत बसली असती. पण, माझ्या वडिलांच्या ध्येयनिष्ठेमुळे शेतकरी संघटनेचं बाळकडू मिळालं, शरदभाऊंकडून आयुष्यभर पुरणारं विचारधन मिळालं आणि माझ्या गुणांना शेतकरी संघटनेच्या मुक्त व्यासपीठावर खऱ्या अर्थानं वाव मिळाला. मी या बाबतीत पूर्ण समाधानी आहे.

मी आज पत्र लिहावयास बसले आहे या मागचं दुःख वेगळचं आहे. हे दुःख शरदभाऊ, तुम्हाला नको सांगू तर कुणाला सांगू? आज मी तुम्हा सर्वांपासून शेकडो कोस दूर आहे. शेतकरी संघटनेचे कार्यक्रम काय चालतात ते कळत नाहीत. वर्तमनापत्रातून उलट सुलट थोडं वाचायला मिळतं. पण बप्पा भेटले म्हणजे शंकानिरसन करून घेता येतं. तरीही शेतकरी संघटनेच्या कामात प्रत्यक्ष सहभागी होता येत नाही याचं फार दुःख होतं.

लग्न झाल्यानंतर जवळ जवळ तीन वर्षे मुंबईत घरच मिळालं नाही. त्यामुळे १९८५ ते ८८ काळात शेतकरी संघटनेचे काम करता आले. याच कालावधीत नांदेडची शेतकरी परीषद, अंबाजोगाईची ज्वारी परिषद, चांदवडचं महिला अधिवेशन अशा महत्त्वाच्या कार्यक्रमात सहभागी होण्याचा आनंद मिळाला. पण मुबईला घर मिळाल्यानंतर संघटनेशी संपर्क तुटला. मी सतत आजारी पडू लागले. के. ई. एम्. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट असतांना तेथील डॉक्टरांनी सांगितले की कसलाच आजार नाही. मग तेथील मनोविकार तज्ज्ञांचा इलाज सुरू झाला. मुंबईला येण्यापूर्वी मी शेतकरी संघटनेचे काम करीत होते, संघटनेचे कार्यकर्ते व महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या घोळक्यात व सभामेळाव्यात वावरलेल्या मला आता एकाकी जीवन जगावे लागत आहे हे डॉक्टरांच्या लक्षात आहे. याच गोष्टीचा माझ्या मनावर परिणाम झाला आहे असे निदान त्या डॉक्टरांनी केले व मला अधूनमधून गावाकडे पाठविण्याचा व शेतकरी संघटनेचे काम बंद न ठेवण्याचा सल्ला दिला.

शरदभाऊ, मध्यंतरी मुंबईला आझाद मैदानावर आपली भेट झाली. त्यावेळी मी आजारीच होते. तुम्ही माझ्या जवळून माझ्याकडे पाहात गेलात. माझ्या लक्षात आले नाही पण माझे पती श्री. सुधाकर यादव माझ्या सोबत होते ते म्हणाले, "शरद जोशींसारखे कुणी तरी तुझ्याकडे पाहात गेले," मी मागं वळून पाहिलं तर ते तुम्हीच होता. मी पळत येऊन तुम्हाला 'भाऊ' म्हणून हाक मारली. तेव्हा तुम्ही म्हणलात, "तुझे पाय आता मुंबईत टेकलेत." एकाच वेळी भेटीचा आनंद आणि तुमच्या या वाक्यानं वाटलेलं दुःख याने डोळे पाणावले. आम्ही सभास्थानी आलो. सभा ऐकली. सभेनंतर मी आपल्याला चिठ्ठी पाठविली. आपण मला पाहून व्यासपीठावरून खाली आलात आणि प्रेमानं माझी चौकशी केलीत. त्यावेळी माझं सगळं दुःख हलकं झालं.

संसाराच्या धावपळीत शेतकरी संघटनेशी संपर्क राखणे कठीण झाले आहे. अमरावतीच्या महिला अधिवेशनाला बाळंतपणामुळे येता आले नाही. संघटनेचे पाच आमदार मुंबईत असूनही आमचे राहाण्याचे ठिकाण शंभर किलोमीटर अंतरावर असल्याने दिवस मोडून त्यांना भेटायला जाणे शक्य होत नाही. त्यामुळे जीव सारखा तुटत असतो.

मी शेतकरी संघटनेचं काम करावं अशी माझ्या पतींची मनापासून इच्छा आहे. पत्नी म्हणून अडथळा नसला तरी दोन वर्षाच्या मुलाच्या आईची जबाबदारी माझ्यावर आहे. आम्ही दोघा नवराबायकोनं ठरवलं आहे की मुलगा पाच वर्षाचा झाला की कळंब तालुक्यात हासेगावी राहून मी शेती व शेतकरी संघटनेचं काम करावे. तसा आम्ही दोघांनी निश्चय केला आहे.

कळावे.

आपली,

**सौ. आशा यादव,**

पाईक, शेतकरी महिला आघाडी.

**भीक नको घेऊ घामाचे दाम**

# शेतीमाल व औद्योगिक माल यांतील किंमतीचे संतुलन

मला स्वतःला स्वित्झर्लंडमध्ये गेल्यावर सर्वात पहिली गोष्ट जावणली ती म्हणजे तेथील 'अन्नक्रांती'. सुपर मार्केटमध्ये खाण्यापिण्याच्या पदार्थांची लयलूट असते. नुसता दुग्धजन्य पदार्थाचा विभाग बघितला तरी माणूस थक्क होऊन जातो. ३०० प्रकारचे चीज. विविध कंपन्यांचे विविध स्वादाचे, चवीचे दही, चक्का, लोणी यापासून केलेले असंख्य पदार्थ, शेकडो रंगांचे मुबलक आईस्क्रिम, मांस, मासे, अंडी, भाज्या, फळे अत्यंत सुबक रीतीने छोट्या छोट्या पॅकेटस्‌मधून ठेवलेले. त्यातील गोडवा हा होता की खाण्यापिण्याच्या बाबतीत असमानता नाही. सर्व लोक सर्व खाद्यपदार्थांचा मनसोक्त उपभोग घेऊ शकतात. असमानता चालू होते ती स्थावर, जंगम मालमत्ता, मालकी अधिकार यापासून. औद्योगिक मालाकडे पाहिले तर तेच. कपडे खेळणी यापासून ते टीव्ही, फ्रीज, मोटार या सर्व वस्तू सर्वांच्या आवाक्यात येतात.

हे कसे शक्य होते? शेतीमाल व औद्योगिक माल यांच्या किंमतींतील संतुलन हे त्यामागचे कारण आहे. हे संतुलन स्वित्झर्लंडमध्ये कसे ठेवले गेले ते पहाण्यासाठी स्विस शेती व स्विस औद्यागिक पार्श्वभूमी पहाणे आवश्यक आहे.

स्वित्झर्लंडचा जास्तीत जास्त भू-प्रदेश शेतीखाली आणायचा म्हटला तरी केवळ ३।५ लोकसंख्येला तो स्वतः अन्नधान्य पुरवू शकतो. उरलेले धान्य, मांस, मासे, अंडी त्यांना आयात करावी लागते. मुक्त अर्थव्यवस्था व मुक्त व्यापारपद्धती त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना परदेशांतील स्वस्त खाद्यपदार्थांशी प्रचंड सामना करावा लागतो. त्याउलट डोंगरावरची शेती, लहान जमीनधारणा व छोटे गोठे यामुळे स्विस शेतीमालाचा उत्पादनखर्च जास्त असतो.

परंतु औद्योगिक प्रसारामुळे प्रदूषण टाळण्यासाठी व लढाईच्या वेळेस काही अंशाने तरी खाद्यपदार्थांच्या बाबतीत स्वयंपूर्णता असावी म्हणून शेती जगवलीच पाहिजे व शेतीखालील क्षेत्र कमी होता कामा नये असे स्विस सरकारचे धोरण आहे. यासाठी १९३० सालापासूनच सरकारने स्विस शेतकऱ्यांचा माल उत्पादनखर्चावर आधारित किंमती देऊन विकत घेण्याचा निर्णय घेतला व तो माल बाजारात आयात केलेल्या खाद्यपदार्थांच्या स्पर्धेत तोंड देईल एवढ्या कमी किंमतीत ते विकू लागले.

याचे पुढच्या २५ वर्षापर्यंत पुढील फायदे झाले. (१) मिळालेल्या नफ्यातून प्रत्येक शेतकऱ्याने शेतीचे यांत्रिकीकरण केले (२) भाज्या, फळे व धान्य मुख्यतः प्रक्रिया करून व हवाबंद डब्यातच विकण्यास पाठविले जाऊ लागले. दुधाच्या प्रक्रियायुक्त खाद्यपदार्थाच्या ग्रामोद्योगाचे एक प्रचंड जाळे तयार झाले.

शेतकरी स्वयंपूर्ण झाले व गेल्या २५ वर्षापासून सरकारी खरेदीची आवश्यकता तेथे राहिलेली नाही. तरीसुद्धा शेतकऱ्यांच्या हिताकडे सरकार डोळ्यात तेल घालून पहात असते. जरूर लागल्यास पुनःश्च व्यापारात पडण्याचे त्यांच्यावर बंधन आहे.

आता हे प्रक्रियेचे कारखानदार शेतकऱ्यांना योग्य भाव देतात का? हे कारखाने सहकारी आहेत का सरकारी? व कारखानदार शेतकऱ्यांचे शोषण करतात का? तर उत्तर आहे हे कारखाने खाजगीच आहेत. व सतत काही वर्षे भावाची हमी मिळाल्यामुळे शेतकरी कारखानदाराच्या तुल्यबळ झाला व आपल्यामाचे भाव स्वतः सांगण्याची त्याला ताकद आली.

## श्रद्धांजली

**१९८२ मधील कोजागिरी पौर्णिमेचा दिवस. साऱ्या जगावर प्रकाशाची पखरण करणाऱ्या या दिवशी शेतकरी संघटनेच्या घरात मात्र गडद अंधाराची छाया दाटली.**

**सौ. आशा यादव यांच्या पत्रात ज्या लीलाताईंची आठवण दिली आहे त्या म्हणजे शेतकरी महिलांचे भाऊ श्री. शरद जोशी यांच्या पत्नी सौ. लीलाताई जोशी. १९८२ च्या कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी (३१ ऑक्टोबर १९८२) त्यांचे दुःखद निधन झाले. श्री. शरद जोशींच्या घरात अंधार तर दाटलाच पण महाराष्ट्रातील अनेक 'आशां'ना आपला आधारच तुटल्यासारखे झाले; म्हणून तर आठवणींचा गोफ उलगडायला बसल्यानंतर हटकून एक पदर सौ. लीलाताईंचा असतो. त्या केवळ शेतकरी मायबहिणींच्याच नव्हे तर भावांच्यासुद्धा खऱ्या अर्थाने ताई होत्या.**

**२२ ऑक्टोबर १९९१. कोजागिरी पौर्णिमा. सौ. लीलाताईंच्या स्मृतीस विनम्र श्रद्धांजली.**

**दिवंगत सौ. लीलाताई जोशींनी 'भूमिसेवक' मध्ये लिहिलेल्या "स्वित्झर्लंडच्या अर्थव्यवस्थेचा मागोवा" या लेखातील काही भाग इथे पुनर्मुद्रित करणे या स्मरणाचे निमित्ताने उचित तर होईलच पण शेतकरी संघटना आपल्या वाटचालीत जे आर्थिक पाऊल उचलण्याच्या विचारात आहे त्या दृष्टीनेही ते प्रसंगोचित ठरेल.**

# ग्रामीण भागात विद्युत - रेचे : कापूस उत्पादकांसाठी वरदान

## — आ. डॉ. वसंत बोंडे

गेली दहा वर्षे संघर्षात्मक आंदोलने करणारी शेतकरी संघटना आता आर्थिक आंदोलनात उतरण्याची तयारी करीत आहे हे देशातील बदललेल्या राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती पाहता अत्यंत रास्त असे पाऊल आहे.

विदर्भ-मराठवाड्यांतील या कापूस पिकविणाऱ्या ग्रामीण भागांत जर विजेवर चालणारे ५ हॉ.पॉ. चे, कापसापासून रूई व सरकी वेगवेगळे करणारे रेचे मोठ्या प्रमाणावर सुरू झाले तर विदर्भातील आर्थिक परिस्थितीला वेगळी कलाटणी मिळण्याची शक्यता आहे. जसे आज गावागावात ५ हॉ.पॉ. वर चालणारे मळणी यंत्र आहेत तसे, पिंजारी जसे विजेवर चालणारे ५ हॉ. पॉ. चे रेचे चालवतात तसे गावागावात सुरू झाले पाहिजे. त्यामुळे शेतकऱ्यांना फार मोठा आर्थिक लाभ होईल.

यावर्षी ३ क्विंटल कापूस जर एकाधिकार योजनेला विकला तर १००० रु. क्विंटलप्रमाणे शेतकऱ्याला ३००० रु. मिळणार आहेत. तसेच गावातच रूई व सरकी वेगळी करून विकला तर? ३ क्विंटल कापसापासून १ क्विंटल रूई व २ क्विंटल सरकी मिळते. आज बाजारपेठेत जे रूईचे भाव आहेत त्याप्रमाणे १ क्विंटल रूईचे ३५०० रु. मिळतील व २ क्विंटल सरकीचे ६०० रु. क्विंटलप्रमाणे १२०० रु. मिळतील. म्हणजे ३५०० + १२०० = ४७०० रु. मिळतील. म्हणजे ३ क्विंटल कापूस, रूई व सरकी वेगळे करून विकले तर १७०० रु. अधिक मिळतील. निदान १००० ते १५०० रु. मिळतीलच मिळतील. ज्या शेतकऱ्यांकडे ३० क्विंटल कापूस पिकेल त्याला १० ते १५ हजार जास्त मिळतील.

शिवाय, शेतकऱ्याला घरच्याघरीच पेरण्यासाठी सरकी उपलब्ध होईल व कमी प्रतिची किंवा कटसीड सरकी गुरांना वैरण म्हणूनसुद्धा उपलब्ध होईल.

कालांतराने ग्रामीण भागात छोटे-छोटे तेल काढणारे उद्योगसुद्धा निघू शकतील. त्यातून निघालेले तेल व ढेप बाजारात विकता येईल किंवा ढेप वैरण म्हणून स्वतः शेतकऱ्याला वापरता येईल.

आता प्रश्न आहे की, यात ज्या काही अडचणी आहेत. त्या कशा दूर करावयाच्या. पहिली अडचण कायद्याची. कच्चा कापूस कायद्याप्रमाणे रूई व सरकी वेगळी करून विकता येत नाही. तरी शासनाने ह्या कायद्यात दुरूस्ती करावी व शेतकऱ्यांना रेचे सुरू करण्यास परवानगी द्यावी. पिंजारी व काही लोकांना शासन सध्या परवानगी देतेच आहे. वाटल्यास ती बंद करून फक्त शेतकऱ्यांनाच ती द्यावी.

कापूस एकाधिकार कायद्यात रूई घेण्याची तरतूद आहेच म्हणून एकाधिकारात कापसाऐवजी रूई घ्यावी व सरकी घेण्याचीसुद्धा व्यवस्था करावी. नाही तरी कापूस महामंडळ खाजगी जिनकडून रूई व सरकी भाडे देऊन वेगळी करून घेतेच आहे. ह्या नवीन व्यवस्थेचे हे काम गावपातळीवर होईल, एवढेच.

ह्यामुळे कापूस उद्योगाला वेगळे वळण लागेल व सरकारने जर रूई फार मोठ्या प्रमाणावर निर्यात करण्याचे धोरण अवलंबिले तर देशाच्या आजच्या आर्थिक परिस्थितीला परकीय चलन मिळून हातभार लागेल. खुद्द पंतप्रधान श्री. नरसिंहराव यांनी निर्यात करावी असे आवाहन शेतकऱ्यांना केले आहेच.

रूई व सरकी वेगळे करणारे रेचे बाजारात उपलब्ध असून १५ तासांत ७ ते ८ क्विंटल कपाशीतून रूई व सरकी वेगळे करण्याची क्षमता असलेल्या रेच्याची अंदाजे किंमत १५००० रुपये व त्यासाठी लागणाऱ्या ५ हॉ. पॉ. च्या मोटरीची स्टार्टर वगैरे साहित्यासह किंमत १०,००० रुपयांपर्यंत पडते. या कामासाठी शेड उभारण्याचा खर्च सुमारे ७५००० रुपयांपर्यंत येईल. असे रेचे बसविण्यास उत्सुक असणाऱ्या शेतकऱ्यांना शासनामार्फत कर्ज मिळावे असे प्रयत्न चालू आहेत.

ज्या शेतकऱ्यांना या योजनेखाली रेचे बसविण्याची इच्छा असेल किंवा यासंबंधी अधिक माहिती हवी असेल त्यांनी खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

**आ. डॉ. वसंत बोंडे**
द्वारा, उपाध्यक्ष,
विधानसभा, कार्यालय, ९ वा मजला,
नरीमन पॉईंट, मुंबई ४११ ०३२.



# शेतकरी संघटक

*शेतकरी संघटक आणि शेतकरी व शेतकरी कार्यकर्ते यांच्यामधील संपर्काचा एकमेव दुवा.*

**वर्गणीदार बनवा :**

★ आपल्या गावोगावच्या मित्रमंडळी तसेच नातेवाईकांना शेतकरी संघटकचे वर्गणीदार बनण्यास उद्युक्त करा.

★ म. ऑ. ने वर्गणी पाठवितांना मनीऑर्डर फॉर्मच्या अगदी तळाशी असलेल्या कोऱ्या जागेत वर्गणीदाराचे नाव, संपूर्ण पत्ता लिहा.

**तक्रारी :**

आपले मित्र / नातेवाईक वर्गणी भरूनसुद्धा अंक मिळत नाहीत अशी तक्रार करीत असल्यास त्यांना त्यांचे नाव पत्ता तसेच वर्गणी कशी (म. ऑ. ने का कार्यकर्त्यामार्फत व कधी पाठविली, ती स्वीकारणाराचे नाव (पावतीवरील सही) अशी संपूर्ण माहिती देऊन संघटकच्या कार्यालयाकडे कार्ड पाठवायला सांगावे म्हणजे त्यांना अंक सुरू करणे सोईचे होईल.

**आजीव वर्गणीदार :**

एक रकमी रु. ५००/- (रुपये पाचशे मात्र) भरणारास शेतकरी संघटकचे आजीव वर्गणीदार समजण्यात येईल. ही वर्गणी म. ऑ. किंवा 'शेतकरी संघटक' या नावाने कोणत्याही बँकेच्या पुण्यातील शाखेवरील डिमांड ड्राफ्टने पाठविता येईल.

**— व्यवस्थापक, शेतकरी संघटक**

# शेतकरी संघटना अध्यक्षांचा दौरा

आळंदी येथील कार्यकारिणी बैठकीत शेतकरी संघटनेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हातात घेतल्यानंतर लगेच अध्यक्ष श्री. किशोर माथनकर यांनी आपल्या महाराष्ट्र दौऱ्यास सुरुवात केली.

२९ व ३० सप्टेंबर रोजी बुलढाणा व अकोला जिल्ह्यातील शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांची बैठक घेऊन त्यांनी १० नोव्हेंबरच्या शेगावच्या वार्षिक शेतकरी मेळाव्याच्या तयारीसंबंधी प्राथमिक चर्चा केली.

९ ते १३ ऑक्टोबर १९९१ या काळात अध्यक्षांनी विदर्भातील इतर जिल्ह्यांचा दौरा करून चंद्रपूर, ब्रह्मपुरी, नागपूर, अमरावती, यवतमाळ व वाशीम येथे त्या त्या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या बैठका घेऊन शेगाव मेळाव्याचा उद्देश व त्याचे महत्त्व सांगून तयारीसंबंधी मार्गदर्शन केले. या दौऱ्यात माजी अध्यक्ष श्री. शंकर धोंडगे व शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सुमनताई अग्रवाल अध्यक्षांसोबत होत्या.

या तिघींनीही १४ ऑक्टोबर रोजी शेगाव येथे भेट देऊन तेथे वार्षिक शेतकरी मेळाव्याच्या कार्यालयाचे उद्घाटन केले. तसेच, मेळाव्यासाठी येणाऱ्या शेतकरी मायबहिणींसाठी सोयीसुविधा, विशेषतः पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात सहकार्य मिळावे म्हणून शेगावमधील विविध संस्था शेगाव आणि अकोला येथील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या. सर्वांनी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे.

अध्यक्ष, माजी अध्यक्ष व महिला आघाडीच्या अध्यक्षा यांच्या संयुक्त दौऱ्याचा दुसरा टप्पा १९ ऑक्टोबर रोजी नांदेड येथून सुरू होत असून तो २ नोव्हेंबरला जळगाव येथे समाप्त होईल. या दौऱ्याची दिनपत्रिका पुढीलप्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| १९/१०/९१ | नांदेड |
| २०/१०/९१ | परभणी |
| २१/१०/९१ | अंबाजोगाई |
| २२/१०/९१ | लातूर |
| २३/१०/९१ | उस्मानाबाद |
| २४/१०/९१ | सोलापूर |
| २५/१०/९१ | सांगली (सकाळी ११) |
| | कोल्हापूर (सायं. ४) |
| २६/१०/९१ | म्हसवड |
| २७/१०/९१ | पुणे |
| २८/१०/९१ | अलिबाग |
| २९/१०/९१ | अहमदनगर |
| ३०/१०/९१ | औरंगाबाद |
| ३१/१०/९१ | नाशिक |
| १/११/९१ | धुळे |
| २/११/९१ | जळगाव |

●●●

# भाऊबीज– बहिणींकडून भावाला

**श्री. आदरणीय शरद जोशी भाऊ यांना आपली लहान बहीण सौ लीलाताई आंभोरे हिचा स. न. वि. वि.**

पत्रास कारण की १०-९-९१ रोजी जिल्हा बैठक झाली त्या बैठकीत मा. श्री. विजयभाऊ जावंधिया व आमदार सौ. सरोजताई काशीकर यांच्या भाषणांत असे वाक्य निघाले की आता संघटनेजवळ निधी शिल्लक नाही, पाक्षिक चालू ठेवण्याइतकीसुद्धा ताकद नाही. कार्यकर्त्यांनी तालुक्या तालुक्यातून वर्गणी पाठवावी असे त्यांनी सुचविले.

बैठकीत हे ऐकून घेतले व भिवापूरला गावी गेले व दुसऱ्या दिवशी आमच्या मजूरदार कार्यकर्त्या बहिणींना हे सांगितले. आता दिपवाळी जवळ येत आहे, यानिमित्ताने शरदभाऊंना आपण १०० बायांनी आपली एक दिवसाची मजुरी भाऊबीज म्हणून पाठवून द्यायची असे आम्ही सर्वांनी ठरवले.

आज दि. १७-९-९१, शुक्रवार. आम्हा सर्व बायांना बाजारमजुरी मिळाली. प्रत्येक मायबहिणीने आपल्या मजुरीतून प्रत्येकी दहादहा रूपये आम्ही ठरविल्याप्रमाणे माझ्याकडे आणून दिले. ते एक हजार रुपये मी लागलीच पाठवीत आहे तरी कृपा करून आमची फूल ना फुलाची पाकळी स्वीकारावी ही नम्र विनंती.

आणि आता १० नोव्हेंबरला शेगाव येथे शेतकरी संघटनेचा भव्य मेळावा होणार आहे. तेव्हा आता त्या मेळाव्याचा प्रचार करता करता मी 'झोळी' करून आणिक पैसे पाठवून देईन. "एखादा 'बाबू' किंवा कर्जवसुली अधिकारी आला की कोंबडी खाऊन जातो आणि पानसुपारीसाठी २०० ते ४०० रूपये घेऊन जातो, मग माझ्या शेतकरी संघटनेने तर जादूची कांडी फिरवली आणि सर्व शेतकऱ्यांना प्रत्येकी १०००० रूपयांची कर्जमुक्ती मिळवून दिली, तरी आपण प्रत्येकी कमीत कमी १० रुपये संघटनेसाठी द्यावे" असे म्हणून झोळी करून बघते व जमलेला निधी आपल्या पुण्याच्या कार्यालयात पाठवते. आम्हा सर्व बहिणींची भाऊबीज आपण स्वीकारावी. काही झाले तरी, आपण संघटनेचे काम चालू ठेवावे आणि कारण आमच्या कष्टकऱ्यांचे मायबाप आपण झालात व गरीब मजुराचे हक्कासाठी आपण सर्वस्व पणाला लावलेत.

असो. माझ्यासारख्या खेड्यातील बहिणीच्या हाताने काही चूक झाली असेल तर तिची क्षमा करावी.

कळावे.

आपली बहीण

**सौ. लि. ना. आंभोरे**

शेतकरी महिला आघाडी, अध्यक्षा

ता. भिवापूर जि. नागपूर.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 21st October, 1991

To

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
October 21, 1991

**PNCW 281**
Licence
to post
without
prepayment
**No. 87**

cqMkyk ‘bafN
nqÆVlagkj
cGhjkT; ;srls
vkuanouHqo

# वार्षिक मेळावा

## शेतकरी हुतात्मा स्मृतीदिनी
## १० नोव्हेंबर १९९१ रोजी
## शेगाव जि. बुलढाणा

***शेतकरी भावांनो आणि मायबहिणींनो,***
***नव्या युगाचे नवे आव्हान स्वीकारण्यासाठी***
***मोठ्या संख्येने मेळाव्यास या.***

पाक्षिक शेतकरी संघटक
मालक – मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ – चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.